**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**प्रेस नोट दि.१३/०८/२०१८**

**दि.१२/०८/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २६१/१८,भादविक ३०७,३२३,३४ |
| **फिर्यादी** | ओंकार लामकाणे,वय-२०,रा.विठ्ठलनगर,वारजे माळवाडी,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०८/२०१८ रोजी २०/३० वा. फिर्यादिचे राहते घरासमोर |
| **तपशिल** | यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी त्यांचेजवळील कोयत्याने फिर्यादी यांचे डोक्यावर डावे कानाचेवर व डावे हाताचे मनगटावर वार करून,त्यांना जखमी करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच दत्ता ढेकणे यास हाताने मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पी.एस.गायकवाड ९०९६७५५४०५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २९४/१८,भादविक ३०७,३४,आर्म ॲक्ट क.४(२५) |
| **फिर्यादी** | शौकत शेख,वय-५७ वर्ष,रा.डायसप्लॉट,गुलटेकडी,पुणे |
| **आरोपी** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/८/२०१८ रोजी १४/०० वा. बुध्दविहार गुलटेकडी समोर डायसप्लॉट गुलटेकडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन,फिर्यादी यांचा पुतण्या सलीम सरदार शेख,वय-१९ वर्षे यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यावर,मानेवर व दोन्ही हातावर कोयत्याने वार करुन,त्यास गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.सी.उसगावकर ७३५०५४७००७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ४०६/१८,भादविक ३०७,३२६,३४ |
| **फिर्यादी** | चैतन्य डुकरे,वय-२२,रा. मुकाईनगर,मारूंजी रोड,हिंजवडी,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०८/२०१८ रोजी २१/०० वा. मेझा ९ ते शिवाजी चौकाचे दरम्यान असणा-या खुशबु पान शॉपवर हिंजवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व यातील नमुद इसम यांचेबरोबर किरकोळ झालेल्या वादावादीचा राग मनात धरून,सदर इसमांनी फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने हाताने व प्लॅस्टिक पाईपने व धारधार हत्याराने वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बलभिम ननवरे ८२०८०८९४४७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे २०३/१८,भादविक ३७९,५११ |
| **फिर्यादी** | ब्रिजेश मिना,वय-३५,रा.मगरपट्टा सिटी,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | चार अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०८/२०१८ रात्रौ ००/४५ वा. ते ०१/४० वा.चे दरम्यान एचपीसीएल पाईपलाईन सर्जा हॉटेलचे मागे,वडमुखवाडी,दिघी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे एचपीसीएल लोणी टर्मिनल,लोणी-काळभोर,ता.हवेली,जि.पुणे येथे परि चालन अधिकारी या पदावर नोकरीस आहेत. त्यांचे कपंनीचे पेट्रोल, डिझेल व कॅरोसीनची पाईपलाईन मुंबई-पुणे मार्गे सोलापुर येथे गेलेली आहे. सदरची पाईपलाईन ही लोखंडी १४ इंची असुन,ती पाईपलाईन जमिनीत पाच ते सहा फुट खोल टाकलेली आहे. पाईप लाईन सोबत ओएफसी कम्युनिकेशन केबल टाकलेली आहे. पाईपलाईनसाठी पाईपलाईनचे उत्तरेस १५ फुट व दक्षिणेस ४५ फुट अशी ६० फुट जागा आरक्षीत केलेली आहे. त्यामध्ये शेतीखेरीज बाकी कामासाठी मज्जाव करण्यात आला आहे. ताजेणमळा ते जाधववाडी पेट्रोलींग सुरक्षागार्ड व सुपरवायजर म्हणुन नेमणुक केली होती. नमुद वेळी व ठिकाणी पाईपलाईनवर १३६.४ किमी अंतरावर खोदकाम होत असले बाबत ऑफीस मधील संगणकाचे अलार्म सिग्नल आला. नमुद कंपनीचे सुपरवायजर घटनास्थळी जावुन जागेची पाहणी केली असता,नमुद वेळी व ठिकाणी यातील चार अनोळखी इसमांनी एक खोरे, प्लॅस्टिकचे घमेले,टिकाऊ,दोन सिमेंटच्या मोकळया पिशव्या व काळे दोन कागद इत्यादि साहित्य घेवुन येवुन,पाईपलाईन गेलेल्या भागाचे जमिनीवर दोन फुट लांब,दोन फुट रूंद व दोन फुट खोल असा खड्डा खणुन त्यातुन निघालेली माती ही साईडला टाकुन देवुन, एचपीसीएल कंपनीचे तेलाच्या पाईपलाईनचे नुकसान करुन,खड्डा खोदुन,पाईपलाईन मधुन तेल चोरुन नेण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. आर.एम.गिरी ९८२२३८००९० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**